महाराष्ट्र शासन
सांस्कृतिक कार्य विभाग

**पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय**

फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार
सी.एस.एम.टी.जवळ, मुंबई - ४०० ००१

दूरध्वनी क्र. (०२२) - २२६२३३८०
इमेल - mahaarchaeology@gmail.com
technical.doam@gmail.com

क्र. तंत्र २०२६/सांकेतिक माहितीपट/1351 दिनांक - 13 AUG 2026

**पाच वारसा स्थळांसाठी सांकेतिक भाषेतील माहितीपट बनविण्यासाठी इच्छुक संस्थांकडून / निर्मात्यांकडून दरपत्रके व स्वारस्य प्रकटन मागविणेबाबत.**

महाराष्ट्रातील विविध पाच वारसा स्थळांसाठी (साल्हेर किल्ला, खांदेरी किल्ला, राजगड, प्रतापगड व रायगड) सांकेतिक भाषेतील माहितीपट बनविण्याचे ठरविण्यात आले असून सदर माहितीपट यशस्वी होण्यासाठी संस्थेची/निर्मात्याची आवश्यकता आहे. त्यानुषंगाने संबंधित क्षेत्रातील अनुभवी, सक्षम व नोंदणीकृत संस्था, एजन्सी व निर्माते यांच्याकडून खाली नमूद केलेल्या कामाकरिता Expression of Interest (EOI) तसेच दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

| अनु. क्र. | कामाचे विवरण |
|---|---|
| १ | वारील नमूद पाच वारसा स्थळांसाठी सांकेतिक भाषेतील माहितीपट बनविणे. |
| २ | प्रत्येक वारसा स्थळाचा माहितीपट सांकेतिक भाषेसह तीन बोली भाषांमध्ये सर्वसमावेशी बनविणे अपेक्षित आहे. |
| ३ | सदर माहितीपट मराठी, हिंदी आणि इंग्रजी या बोलीभाषेतील voiceover तसेच त्याच भाषेतील उपशीर्षका (सबटायटल) सहित असावेत. |
| ४ | प्रत्येक माहितीपटाचा कालावधी साधारण ०४ मिनिटे असावा. |
| ५ | माहितीपटांचे चित्रीकरण भारतीय सांकेतिक भाषेत आणि क्रोमा स्क्रीनवर करणे अपेक्षित आहे. |
| ६ | सांकेतिक भाषेचे सादरीकरण कर्णबधिर तज्ज्ञांनी करणे अपेक्षित आहे. |

- अटी व शर्ती:
  १. संबंधित क्षेत्रातील अनुभव असलेल्या संस्था/एजन्सींना प्राधान्य दिले जाईल.
  २. संस्थेने आवश्यक नोंदणी प्रमाणपत्रे, GST नोंदणी, PAN, तसेच अनुभवाची कागदपत्रे सादर करावीत.
  ३. दरपत्रकात सर्व करांसह अंतिम दर स्पष्ट नमूद करावेत.
  ४. दरपत्रक / निविदा लेटरहेडवर सादर करण्यात यावी. यामध्ये GST क्रमांक तसेच तत्सम नोंदणी क्रमांक नमूद करण्यात यावा.
  ५. आयोजकास कोणतेही अथवा सर्व दरपत्रके स्वीकारण्याचा किंवा नाकारण्याचा अधिकार राहील.

६. आवश्यकतेनुसार संस्थेला कामाचे सादरीकरण (Presentation) करण्यास सांगितले जाऊ शकते.
७. कामाचे स्वरूप, कालावधी व इतर अटी अंतिम आदेशानुसार लागू राहतील.
८. विहीत मुदतीत प्राप्त न झालेले दरपत्रक नाकारण्याचा अधिकार संचालनालयाने राखून ठेवला आहे. तसेच टपालाद्वारे पाठविलेल्या निविदा / दरपत्रक वेळेत प्राप्त न झाल्यास हे संचालनालय जबाबदार राहणार नाही.
९. सादर केलेले दरपत्रक अथवा संपूर्ण प्रक्रिया रद्द करण्याचे सर्व अधिकार संचालकांनी आपल्याकडे राखून ठेवले आहेत.

- EOI सादर करण्याची अंतिम तारीख: २१.०८.२०२६

- सादर करण्याचा पत्ता :
  संचालक, पुरातत्व व वस्तुसंग्रहालये संचालनालय,
  फोर्ट जॉर्ज, सेंट जॉर्ज रुग्णालय आवार,
  छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस जवळ,
  मुंबई ४०० ००१

(डॉ. तेजस म. गर्गे)
संचालक